**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004**
Phone: EPABX –2609000 Seminar Section – 2609141
Fax: +91-231-2691533, 2693294 & 2692333 Website: www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर 416 004**
फोन :इपीबीक्स – 2609000 सेमिनार विभाग 2609141
फॅक्स: +91-231-2691533,2693294 & 2692333 email: pgseminar@unishivaji.ac.in
**Estd : 1962**
**NAAC 'A' Grade**

संदर्भ क्र. :– शिवाजी वि./सेमिनार विभाग/नियतकालिक स्पर्धा/एसएमपी 48 दि. 31 MAR 2018

**प्रति,**

1. **प्राचार्य,**
   सर्व संलग्न महाविद्यालये,
2. **संचालक,**
   मान्यताप्राप्त शिक्षण संस्था

**विषय :– शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा सन 2017–2018.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सृजनशीलतेची जोपासना व्हावी, त्यांच्यातील सृजनशीलता अधिकाधिक वृध्दिंगत व्हावी यास्तव महाविद्यालयामधून प्रतिवर्षी नियतकालिके प्रकाशित केली जातात आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठामार्फत प्रतिवर्षी नियतकालिक स्पर्धा आयोजित केली जाते.

या स्पर्धेसाठी नियतकालिकाचे एकूण स्वरूप, छपाई, मांडणी इ. चे मूल्यमापन हे त्या त्या विषयातील तज्ज्ञांकडून करून घेतले जाते. त्याचबरोबर नियतकालिकातील विद्यार्थ्यांच्या लेखन प्रकारांचे मूल्यमापनही तज्ज्ञांकडून करून घेतले जाते. मूल्यमापनातील सर्वाधिक गुणांनुसार स्पर्धेत यशस्वी झालेल्या पहिल्या तीन महाविद्यालयांना सन्मान चिन्हे आणि वैयक्तिकरित्या यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना व्यक्तिगत पारितोषिके व प्रशस्तिपत्र देवून गौरविण्यात येते.

सन 2017–2018 या शैक्षणिक वर्षातील शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेमध्ये आपण सहभागी व्हावे अशी विनंती सदर परिपत्रकाद्वारे करण्यात येत आहे. **रू. 250/– प्रवेश शुल्काचा धनाकर्ष (डी. डी.) "मा. वित्त व लेखाधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर" यांचे नांवे काढून तो व आपल्या महाविद्यालयाच्या प्रकाशित नियतकालिकांच्या 5 प्रती संकेतस्थळावर ठेवण्यात आलेल्या विहित नमुन्यातील प्रवेशपत्रासोबत दिनांक 30 एप्रिल, 2018 पूर्वी या कार्यालयास प्राप्त होईल अशा रितीने पाठवाव्यात. प्रवेशपत्रामध्ये जरूर ती माहिती भरून ती नियतकालिकासोबत प्रवेश शुल्कासह पाठविणे आवश्यक आहे. प्रवेश शुल्क व प्रवेशपत्र नियतकालिकासोबत न पाठविल्यास तसेच अर्जातील माहिती अपुरी असल्यास आणि दि. 30 एप्रिल, 2018 पर्यंत नियतकालिके स्पर्धेसाठी प्राप्त न झाल्यास अशी नियतकालिके नियमानुसार अपात्र ठरविण्यात येतील.**

सदरचे परिपत्रक, नियमावली व प्रवेशपत्र हे विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in →Circular →Board of College and University Development → Seminar Section (College Magazine Competition) या संकेतस्थळावर ठेवण्यात आलेले आहे. तेव्हा विहित मुदतीनंतर आलेल्या आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे अपूर्ण नियतकालिकांचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही व त्याबाबतची कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा

विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सृजनशीलतेची जोपासना व्हावी, ती वृध्दिंगत व्हावी म्हणून संलग्न महाविद्यालयातून प्रतिवर्षी नियतकालिके प्रकाशित केली जातात. या अंकातून वाङ्मय निर्मिती करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने आणि महाविद्यालयांकडून उत्तम दर्जाचे वार्षिक अंक प्रकाशित व्हावेत या हेतूने शिवाजी विद्यापीठाची ही योजना इ.स.1970 पासून सुरू आहे. आता या योजनेचे नामाभिधान **"शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा"** असे राहील.

❖ **योजनेचे नियम :**

1. शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या कोणत्याही महाविद्यालयास या योजनेत रू. 250/- प्रवेश फी व प्रवेशपत्र भरून सहभागी होता येईल.
2. महाविद्यालयात नियमित प्रवेश घेऊन अध्ययन करणाऱ्या तसेच महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्यांस या योजनेत सहभागी होता येईल.
3. या योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालयांना आपल्या नियतकालिकांच्या **पाच प्रती** मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे दि. 30 एप्रिल पूर्वी सादर कराव्या लागतील. विद्यापीठ परीक्षकांकडून अंकांचे मूल्यमापन करून घेईल.
4. शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेसाठी विद्यापीठाशी संबंधित नसलेले विषयतज्ज्ञांचे परीक्षक मंडळ तसेच समिती अध्यक्ष व परिनिरीक्षक नियुक्ती मा. कुलगुरू करतील. परीक्षा मंडळात एकूण सात व्यक्ती असतील. परीक्षकांची नांवे गोपनीय राहतील. तसेच व्यवस्थापन परिषदेचा एक सदस्य परिनिरीक्षक म्हणून काम पाहील. परीक्षा मंडळातील प्रत्येक सदस्यास प्रतिवर्षी खालीलप्रमाणे मानधन देण्यात येईल. तथापि, परिनिरीक्षक म्हणून काम करणाऱ्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्याला कोणत्याही प्रकारचे मानधन देणे अपेक्षित नाही.

   **अ.** संबधित विषयाचे लेख (Articles) त्या त्या तज्ज्ञांच्याकडे पाठविण्यात येतील.

   **ब.** प्रत्येक वर्षी नवीन समिती करण्यात येईल.

   **क.** मराठी, हिंदी, इंग्रजी, फोटोग्राफी /व्यंगचित्रे/पेटींग, विज्ञान, अभियांत्रिकी/ वास्तूशास्त्र, विधी व अंकाच्या छपाईचा दर्जा, मांडणी, निर्मितीमूल्य, या लेखाच्या परिक्षणासाठी रू. 3000/- आणि शिक्षणशास्त्र, उर्दू, कन्नड व संस्कृत या परीक्षकांना रू. 750/- इतके मानधन देण्यात येईल. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेमार्फत नामवंत साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, त्या त्या विषयातील मान्यताप्राप्त व्यक्ती, तसेच लेखन, संपादन, समीक्षा, संशोधन या क्षेत्रातील अनुभवी व्यक्तीची परीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात येईल. गुणवत्तेच्या आधारे परीक्षण करून परीक्षक गुणवत्ता क्रमांक देतील.

   **ड.** विज्ञान विषयक लेखांचे परीक्षण करण्यासाठी त्या विषयातील स्वतंत्र तज्ज्ञ परीक्षक असतील ते त्या विभागातील लेखांचे मूल्यमापन करतील.

   **इ.** एक परीक्षक अभियांत्रिकी व वास्तूशास्त्र विषयातील तज्ज्ञ असतील ते या विभागातील लेखांचे मूल्यमापन करतील.

   **फ.** व्यंगचित्रे, छायाचित्रे, चित्रकला, रेखाचित्रे (पेन्सिल/शाई) इत्यादींच्या परीक्षणासाठी त्या विषयातील तज्ज्ञ परीक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.

   **ग.** एक परीक्षक, अंकाच्या छपाईचा दर्जा, मांडणी, निर्मितीमूल्य, मुखपृष्ठ, कलात्मकता या गोष्टी ध्यानात घेऊन गुणदान करतील.

   **ह.** सर्वसाधारण विजेता अंकाची निवड करताना मराठी, हिंदी, इंग्रजी, विज्ञान, कला कौशल्य (फोटोग्राफी/व्यंगचित्रे/पेंटींग) व मुद्रण या 6 परीक्षकांनी दिलेल्या गुणांची एकत्र बेरीज करून सरासरी गुणांच्या आधारे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक दिले जातील. परिनिरीक्षक व परीक्षक मंडळ सर्व गुणवत्ता क्रमांकाची तपासणी करून पुरस्कारांना अंतीम मान्यता देतील. मात्र परिनिरीक्षक कोणत्याही प्रकारचे गुणदान करणार नाहीत.

...2

5. **सन्मानचिन्हे आणि पारितोषिके** : स्पर्धेसाठी सर्व संलग्नित महाविद्यालयांची विभागणी दोन गटात करण्यात आली असून एक गट व्यावसायिक महाविद्यालयांचा (अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र आणि व्यवस्थापन) असेल आणि दुसरा गट कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांचा असेल.

अ. **सर्वसाधारण विजेता पुरस्कार** : एकूण सहा सन्मान चिन्हे असतील. वरील प्रत्येक गटासाठी प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाची तीन फिरती सन्मान चिन्हे स्वतंत्रपणे देण्यात येतील.

ब. **व्यक्तिगत पारितोषिके** : वरील सर्वसाधारण सन्मान चिन्हांशिवाय रोख रक्कमेची पारितोषिके विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिगत स्वरूपात दिली जातील. त्यामध्ये प्रथम, द्वितीय तृतीय असे गुणवत्ता क्रमांक असतील.पारितोषिकाची वर्गवारी पुढीलप्रमाणे असेल. ही वर्गवारी मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांसाठी स्वतंत्रपणे लागू असेल.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **कथा** | 2 | **कविता** | 3 | **एकांकिका** |
| 4 | **ललितलेख** | 5 | **व्यक्तिचित्र** | 6 | **मुलाखत** |
| 7 | **आत्मकथनपर लेखन** | 8 | **विनोदी लेख** | 9 | **प्रवासवर्णन** |
| 10 | **वैचारिक लेखन** | 11 | **समीक्षा** | 12 | **माहितीपर लेखन** |
| 13 | **संशोधनपर लेखन** | | | | |

माहितीपर लेखन आणि संशोधनावर लेखन यामध्ये विज्ञानपर आणि विज्ञानेतर अशी विभागणी असेल. विज्ञानपर विशेष लेखनाचे परीक्षण विज्ञान विषयातील तज्ज्ञ स्वतंत्रपणे करतील आणि त्यासाठी स्वतंत्र पारितोषिके असतील, तसेच अभियांत्रिकी व वास्तुशास्त्र विषयातील माहितीपर व संशोधनपर विशेष लेखांचे परीक्षण त्या विषयातील तज्ज्ञ परीक्षक करतील व त्यांना स्वतंत्र पुरस्कार दिले जातील असे एकूण 15 लेखन प्रकारांना पुरस्कार असतील. त्यात प्रथम, द्वितीय, तृतीय असे क्रमांक दिले जातील. अशा तऱ्हेने एकूण 153 व्यक्तिगत पारितोषिके दिली जातील.

क. **कला कौशल्ये पारितोषिके** : या अंतर्गत पुढील चार विभागांना व्यक्तिगत स्वरूपाची एकूण 12 पारितोषिके असतील. त्यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय असे क्रमांक असतील त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल.

1) व्यंगचित्र 2) छायाचित्र 3) रंगचित्र 4) रेखाचित्र (पेन्सिल / शाई)

ड. वरील पारितोषिकांशिवाय संस्कृत, कन्नड, उर्दू या भाषेतील लेखनांसाठी प्रत्येकी एक अशी तीन प्रोत्साहनपर पारितोषिके असतील. अशा तऱ्हेने व्यक्तिगत पारितोषिकांची एकूण संख्या 156 राहील. प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाची पारितोषिके मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देण्यात येतील. तसेच सर्वसाधारण पुरस्कार प्राप्त करणाऱ्या महाविद्यालयांनाही प्रशस्तीपत्र देण्यात येईल.

6. सर्वसाधारण पुरस्कारांसाठी आणि व्यक्तिगत पारितोषिकांसाठी गुणवत्ता क्रमांक देताना साधारणपणे पुढीलप्रमाणे निकष ध्यानात घेणे अपेक्षित आहे.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **क)** | छपाईचा दर्जा | **ख)** | मांडणी | **ग)** | विषयाची विविधता | **घ)** | महत्वाच्या विषयाची हाताळणी | **च)** | वाङ्‌मयीन गुणवत्ता |
| **छ)** | माहितीचे नाविन्य | **ज)** | सौंदर्यदृष्टी | **झ)** | कल्पनापूर्णता | **त)** | निर्मितीमूल्य | **थ)** | मुखपृष्ठ इ |

7. प्रत्येक परीक्षक आपआपल्या विषय, विभागानुसार, मार्गदर्शक तत्वानुसार गुणदान करून गुणतक्ता तयार करतील आणि प्रतिवर्षी 30 जून अखेर आपला निर्णय कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना कळवतील.

8. स्पर्धेचा निर्णय प्रतिवर्षी 1 ऑगस्टपर्यंत जाहीर करण्यात येईल. प्रतिवर्षी या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ विद्यापीठात स्वतंत्रपणे घेण्यात येईल. पुरस्कारप्राप्त महाविद्यालये प्राचार्य, कार्यकारी संपादक आणि व्यक्तिगत पारितोषिकप्राप्त विद्यार्थी यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येईल. या संदर्भातील प्रवासखर्च व अन्य खर्च त्या महाविद्यालयाने करावयाचा आहे.

9. परीक्षकांच्या निर्णयानुसार एखादे लेखन पारितोषिक देण्यायोग्य गुणवत्तेचे आढळले नाही तर ते पारितोषिक दिले जाणार नाही. या संदर्भातील परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

10. स्पर्धेचा निकाल सर्व परिक्षकांना आणि संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांना प्रतिवर्षी पाठविण्यात येईल.

11. **ही योजना केवळ वरिष्ठ महाविद्यालयांसाठीच असल्याने वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयांचा अंक एकत्र छापणाऱ्या महाविद्यालयांनी वरिष्ठ महाविद्यालयांचा विभाग स्वतंत्र करावा. तसेच पदव्युत्तर विभागही स्वतंत्र छापावा.**

12. टोपणनांव धारण करून लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी टोपण नावाबरोबरच आपले संपूर्ण नांव योग्य त्या ठिकाणी छापण्याची खबरदारी घ्यावी. त्याचप्रमाणे योग्य त्या ठिकाणी त्या त्या विद्यार्थ्याच्या नावाबरोबर शिकत असलेला वर्ग व विद्याशाखेचा निर्देश करावा. असा निर्देश नसल्यास त्या लेखनाचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही. विजेत्या विद्यार्थ्यांचा धनादेश इंग्रजी भाषेमध्ये असल्याने इंग्रजी नावही देण्यात यावे.

**सन्मान चिन्हे आणि व्यक्तिगत पारितोषिकाचे विवरण**

**अ. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये गट**

**सर्वसाधारण विजेतेपद (फिरते)**

1. प्रथम कमांक :— सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र
2. द्वितीय कमांक :— सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र
3. तृतीय कमांक :— सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र

**ब. व्यावसायिक महाविद्यालये गट**

1. प्रथम कमांक :— सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र
2. द्वितीय कमांक :— सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र
3. तृतीय कमांक :— सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र

**क. विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिगत पारितोषिक**

| अ.क | लेखन प्रकार | प्रथम | द्वितीय | तृतीय |
|---|---|---|---|---|
| 1. | कथा | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 2. | कविता | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 3. | एकांकिका | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 4. | ललित लेख | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 5. | व्यक्तिचित्रे | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 6. | मुलाखत | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 7. | आत्मकथनपर लेखन | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 8. | विनोदी लेख | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 9. | प्रवास वर्णन | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 10. | वैचारिक लेखन | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 11. | समीक्षा | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 12. | माहितीपर लेखन | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |

| अ.क | लेखन प्रकार | प्रथम | द्वितीय | तृतीय |
|---|---|---|---|---|
| 13. | संशोधनपर लेखन | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 14. | माहितीपर लेखन (विज्ञान) | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 15. | माहितीपर लेखन (अभियांत्रिकी/वास्तूशास्त्र) | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 16. | संशोधनपर लेखन (विज्ञान) | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 17. | संशोधनपर लेखन (अभियांत्रिकी/वास्तूशास्त्र) | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 18. | माहितीपर लेखन (विधी) | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 19. | संशोधनपर लेखन (विधी) | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 20. | माहितीपर लेखन (शिक्षणशास्त्र) | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 21. | संशोधनपर लेखन (शिक्षणशास्त्र) | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |

**ड. कला कौशल्ये पारितोषिक**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | व्यंगचित्र | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 2. | छायाचित्र | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 3. | चित्रकला | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |
| 4. | रेखाचित्र इ. (पेन्सिल/शाई) | रू. 500/— | रू. 300/— | रू. 200/— |

**इ. प्रोत्साहनपर पारितोषिक**

| | | |
|---|---|---|
| 1. | संस्कृत | रू. 300/— |
| 2. | उर्दू | रू. 300/— |
| 3. | कन्नड | रू. 300/— |

—ooo—

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा सन 2017–18

## प्रवेश पत्र

| | | |
|---|---|---|
| **1.** | महाविद्यालयाचे नांव<br>संक्षिप्त नाव | :– |
| **2.** | पत्रव्यवहाराचा पत्ता | :– |
| **3.** | विद्यार्थी पट संख्या | :– |
| **4.** | नियतकालिक प्रकाशन कालावधी | :– |
| **5.** | प्रकाशन वर्ष | :– |
| **6.** | विद्यार्थ्यांकडून नियतकालिकासाठी काही फी आकारली जाते का? असल्यास किती? | :– |
| **7.** | नियतकालिकेचे नांव (मराठीमध्ये) | :– |
| **8.** | प्रकाशकाचे नांव, पत्ता व दूरध्वनी / मोबाईल क्र. | :– |
| **9.** | संपादकाचे नांव व दूरध्वनी / मोबाईल क्र. | :– |
| **10.** | मुद्रकाचे नांव व पत्ता | :– |
| **11.** | किती प्रती छापल्या? | :– |
| **12.** | नियतकालिकासाठी एकूण किती खर्च आला? प्रत्येक मथळयाखाली झालेल्या खर्चाचा सविस्तर तपशील दर्शविणारा तक्ता जोडावा. | :– |
| **13.** | समितीस उपयोगी ठरेल अशी अन्य काही माहिती असल्यास ती सादर करावी | :– |
| **14.** | शुल्क भरणा केलेली माहिती | :– पावती क्र.     दि.<br>डिमांड ड्राफ्ट     दि.<br>बॅंकेचे नाव – |

**प्राचार्यांची सही :–**          **संपादकांची सही :–**

**शिक्का**